# महाराष्ट्रातील आदिवासींच्या नृत्यनाट्यांचा चिकित्सक अभ्यास

*प्रा. डॉ. माधव बसवंते

**प्रास्ताविक** महाराष्ट्रात आदिवासींची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असून त्यांनी डोंगरदऱ्याशी आणि वनांशी आपले नाते टिकवून ठेवले आहे. या आदिवासींच्या अनेक जमाती असून त्यांच्या जीवनात मोठ्या प्रमाणात अज्ञान, दारिद्र्य आणि अंधश्रद्धा दिसून येतात. आपल्या परिस्थितीशी संघर्ष करीत आदिवासी लोकांनी आपले सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे जतन करुन ठेवले आहेत. त्यांचे जीवन अनेक उत्सवांनी भरलेले आहे. अशा या आदिवासींची अनेक नृत्यनाट्ये आहेत. नाचणे आणि गाणे हा आदिवासींचा स्वभाव गुणधर्म आहे. आपल्या सामाजिक संघर्षमय जीवनात आदिवासी जमातींनी आपल्या सांस्कृतिक संचिताचे जतन केले आहे.

**आदिवासीचे नृत्यसंगीत** आदिवासी जमातीच्या नृत्य संगीताचा विचार करता त्यांच्या नृत्य संगीताचा उगम हा धर्मभावनेतून झाला आहे अशी त्यांची समजूत आहे. आदिवासींना 'बडादेव' यांनी नृत्य दिल्याचे ते समजतात. तर गोंडाची अशी श्रद्धा आहे की, दंडार हा 'भीवसन देवाने' सुरु केला. एकंदरीत आदिवासींच्या नृत्याचा उगम हा देवतांच्या नृत्यामधून झाला असून देवापर्यंत पोहोचण्यासाठी नृत्य हाच एकमेव मार्ग आहे, अशी त्यांची समजूत झाली आहे. म्हणून आदिवासी जमाती नृत्यमय जीवन त्यांनी आपल्या सामाजिक उत्सवाच्या माध्यमातून नाचगाण्यातून आनंद व्यक्त करीत असतात. त्यामुळे नृत्य आणि संगीत हे त्यांच्या संस्कृतिचे एक अभंग अंग निर्माण झाले आहे.

या आदिवासींच्या नाट्य आणि नृत्य यामध्ये साम्यता दिसून येते. त्यांची काही नाट्ये ही गेयात्मक स्वरुपाची आहेत. आदिवासी समाजातील गोंड, कोलाम, कोरकू, भिल्ल, ठाकर, वारली याचबरोबर अन्य आदिवासी जमाती पारंपरिकपद्धतीने नृत्य करतात. धार्मिक विधीच्या वेळी नृत्य करण्याची प्रथा त्यांच्यात दिसून येते.

**भिल्लांचे नृत्यनाट्य** महाराष्ट्रातील सातपुडा डोंगररांगेत आदिवासी भिल्लांची मोठी लोकवस्ती आहे. हे आदिवासी भिल्ल आनंदी जीवन जगण्यासाठी नृत्यनाट्ये साजरी करतात. स्त्री-पुरुष व मुले-मुली हे एकमेकांचा वेश परिधान करुन व कमरेला घुंगरु बांधून नृत्य करतात. होळीच्या सणाला भंगोऱ्या नृत्य करतात. धुळे जिल्ह्यातील आदिवासी 'डींडण' या नावाचे नृत्य त्यांचा एक धार्मिक विधी असतो. 'डींडण्य या नृत्याच्या मुख्य सूत्रधाराला 'पीट' असे म्हणतात. तो सर्वांचा धर्मगुरु असतो. तसेच या आदिवासी भिल्लांचा सुगीच्या हंगामात 'बोंडा' या नावाचे नृत्यनाट्य सुरु होते. या नृत्यनाट्यात आदिवासींनी वेगवेगळ्या देवतांचे मुखवटे घालून नृत्य करीत आपला उत्सव साजरा करतात.

**मादळ** आदिवासी जमातींचा मादळ किंवा मांदोळ हा एक प्रमुख नाट्यविष्कार आहे. त्यांचे हे नाट्यविष्कार त्यांच्या वाद्यावरुन ओळखले जातात. मादोळ हे एक वाद्य असून ते मातीचे किंवा लाकडाचे असते. हे वाद्य भवानी मातेचे समजून आदिशक्ती भवानी या स्वरुपात त्यांची श्रद्धेने पूजा केली जाते. मादोळ वाद्य देवतांच्या लग्नासाठी तयार झालेले आहे. अशी त्यांची श्रद्धा दिसून येते. हे वाद्य आदिवासीच्या प्रत्येक वस्तीवर दिसून येते.

मादळ हा लग्नविधीत केला जाणारा नाट्यविधी आहे. या मादळ नाट्याला कोणत्याही प्रकारची लिखित संहिता नसते. तर तिची संहिता ही मौखिक आणि मुक्त स्वरुपात असते. त्यात पारंपरिकपद्धतीने गीत म्हटले जाते. असा हा मादळ नाट्यविधी पूर्वरंग आणि उत्तररंग अशा या दोन विभागात विभागलेला असतो.

**भवाडा** आदिवासी जमातीच्या कलाविष्कारातील भवाडा हे एक नृत्य नाट्य आहे. हे नृत्यनाट्य आदिवासीच्या महादेवकोळी, भिल्ल, कोकणा ठाकूर यासारख्या जमातीमध्ये दिसून येते. भवाडे हे नृत्यनाट्ये मुखवट्यांच्या आधारे साजरे केले जाते. भवाड्याचे हे मुखवटे लाकूड, शेण, माती, भात किंवा कागद यापासून बनविलेले असतात. भवाडा या नृत्यनाट्याला भारताच्या वेगवेगळ्या प्रादेशिक भागात वेगवेगळ्या नावाने ओळखतात.

**दंडार** महाराष्ट्रातील आंध, गोंड, कोलाम इ. आदिवासी जमातीमध्ये दंडार हा लोकनृत्याचा प्रकार दिसून येतो. दंडार हे एक विधीनाट्य आहे. हे विधिनाट्य दंडारच्या स्वरुपावरुन दिसून येते. डोक्यावर मोरपिसांचा टोप, मुखवटी चेहरा, संपूर्ण अंगावर राख, काखेत झोळी, गळ्यात रुद्राक्ष माळा, पायात व कंबरेला घुंगरु,

हातात कमंडलू अशा स्वरुपातील दंडारचे नृत्य एक विधीच असतो. अशाप्रकारची दंडार नृत्य केल्यामुळे गावात सुख, समृद्धी, शांती लाभून गावात संकटे येत नाहीत अशी आदिवासीची समजूत आहे. या दंडार नृत्यात आदिवासी स्त्रियांचा सहभाग नसतो. नृत्यासोबत त्या फक्त गाणी म्हणत असतात. या दंडार नृत्यामध्ये वाद्यांची साथ असते. या दंडार नृत्यातील लेंढार, गोफ, घोरपडी असे काही उपप्रकार दिसून येतात.

**वेताळक** आदिवासी कोलामच्या सण उत्सवाच्या प्रसंगी जे नृत्यगीत नकलांच्या माध्यमातून सादर करतात त्यास 'वेताळक' म्हणतात. इतिहासाचे कथन करणारे हे नृत्यगीत लग्नतिथीच्या रात्री करण्यात येतो. यामध्ये विविध नकला सादर केल्या जातात. त्याचबरोबर आदिवासींच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचे अभिनयही या कार्यक्रमाच्या माध्यमातून सादर केले जातात. एंकदरीत हा

*मराठी विभाग, इंदिरा गाँधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड

इतिहासविषयक कार्यक्रम असला तरी तो कलापूर्ण मनोरंजक आणि उद्‌बोधक असतो. गाणी म्हणत नृत्य करणे, निरनिराळी सोंगे करीत आदिवासींचे रंजन करणे व माहिती सांगून मार्गदर्शन व दिग्दर्शन करण्याचे काम वेताळक करतो.

**निष्कर्ष**

१) आदिवासी जमातीचे जगणे हे संघर्षमय असले तरी त्यांनी आपल्या सांस्कृतिक संचिताचे जतन करीत असतात.

२) "गाणाऱ्या आणि नाचणाऱ्या जमाती" असे महाराष्ट्रातील आदिवासी जमातीचे स्वभाव लक्षण सांगता येईल.

३) आदिवासीचे कलाविष्कार वा नाट्याविष्कार ही जीवनलक्ष्यी स्वरुपाचे असतात.

४) आदिवासी जमातींच्या नृत्यसंगीताचा उगम हा धर्मभावनेतून झाल्याचे दिसून येते.

५) आदिवासींच्या पारंपरिक कलाविष्कारात विविध माध्यमांची एकरुपता दिसून येते

६) महाराष्ट्रातील आदिवासी जमातीची मादळ, भवाडा, दंडार आणि वेताळक ही त्यांच्या लोकाविष्काराची व नाट्यविष्कारांची सर्वसामान्य माध्यमे आहेत.

७) आदिवासी जमातीच्या या नाट्यविष्कारातून त्यांची जीवनदृष्टी प्रभावीपणे प्रकट होते.

८) आदिवासी जमातीच्या नृत्यनाट्यात प्रामुख्याने मुखवट्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो.

## संदर्भ ग्रंथ

१) डॉ. सरोजिनी बाबर, आदिवासींचे सण व उत्सव. २) डॉ. भागवत दुर्गा, लोकसाहित्याची रुपरेषा. ३) डॉ. मांडे प्रभाकर, लोकरंगभूमी, परंपरा स्वरुप व भवितव्य. ४) डॉ. गारे गोविंद, आदिवासींची लोकनृत्ये. ५) जोशी वि.कृ. लोकनाट्याची परंपरा.